नियमित दिवाणी दावा २४७/ २०२२

नि. ३१ लगत.

**उलटतपास आज रोजी शपथेवर पुढे सुरू.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे  विधिज्ञ श्री. खंजीरे  यांचे कडून –**

हे म्हणणे खरे आहे की, सि.स.नं.१५३४ आमच्या पुर्वजांची मालकी असलेबाबातचा  रजिस्टर दस्त माझ्याकडे नाही.  हे म्हणणे खरे आहे की, सि.स.नं. १५३४ हा सन १९६८ साली झाला आहे व सन १९६८ ते १९९० त्यावर घर होते. त्यावर घर नंबर काय होता त्याचा मिळकत नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की,सन १९६८–१९९० चा घर मिळकतीचा असेसमेंट उतारा किंवा घरफाळा पावती मी या कामी दाखल केली नाही तसेच सि.स.नंत.१५३४ मध्ये सन १९९० ते दावा दाखल करेपर्यंतचा असेसमेंट उतारा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत कलम १ ब या मिळक्तीमध्ये विदयुत कनेक्शन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा कलम १ ही मिळक्त ही पट्टणकोडोली येथील टेलिफोन ऑफीसजवळ आहे.  हे म्हणणे खरे नाही की, दावा कलम १ब मधील विदयुत कनेक्शन हे प्र.वादी नं. २ च्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम १ ब मधील मिळकतीमध्ये माझे व माझ्या पुर्व हक्कदाराच्या नावाने विदयुत कनेक्शन नाही. हे म्हणणे खरे नाही की, सि.स.नंबर होण्या अगोदार  दावा मिळकतीच्या पुर्वेला धनगर समाजातील लोकांच्या शेतजमिनी होत्या, दक्षिणेलाही धनगर समाजाच्या लोकांच्या शेतजमिनी होत्या, पश्चीमेला प्रतिवादीची घर मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, उत्तरेला प्र.वादीचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सि.स.नं. १५२०,१५२१ आणि १५२२ या दावा मिळकतीच्या पश्चीमेला प्र.वादीच्या घराला लागून आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळक्तीला सुरवातील प्र.वादीचे पुर्वहक्कदार दिनकरराव बाबासाहेब यांची नावे लागलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सि.स.नंबर झाल्यापासून सन १९६८ पासून सन १९९० पर्यंत मी किंवा माझ्या पुर्व हक्कदार यांनी ग्रामपंचायतला नाव लावून घेण्यासाठी काही प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीला नाव नोंदणी करून घेण्यासाठी आम्हाला काहीही अडचण नव्हती.  हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळक्त सन १९५७ ते १९५८ पासून प्र.वादीचे पुर्व हक्कदार व त्यानंतर प्रतिवादीच्या मालकी कब्जेवहिवाटीस आहे.

मला माहित नाही की, प्र.वादी नं. १ ते ३ यांना चार बहिणी आहेत. मला प्र.वादी नं. १ ते ३ च्या चार बहिणी माहित नसल्यामुळे त्यांना पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रंगराव बाबुराव निकम हे सि.स.नं. १५३४ मध्ये ५ आणे ४ पै हिस्साचे मालक होते. मला माहित नाही की, रंगरावचा मुलगा कृष्णात रंगराव निकम हा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णात रंगराव निकम यांचा सि.स.नं.१५३४ मध्ये ५ आणे ४ पै हिस्सा आहे त्याप्रमाणे त्यांची मिळकतीला नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आनंदराव यशवंतराव निकम यांचा सि.स.नं.१५३४ मध्ये ५ आणे ४ पै हिस्सा होता व त्यांनी त्यांचा हिस्सा बाळासाो देहु परीट यांना विकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळासाो देहू परीट हे मयत असून त्यांच्या वारसाची नावे सि.स.नं. १५३४ ला नमूद झालेली आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, मी इचलकंरजी येथील दिवाणी न्यायालय क. स्तर, कोर्ट नं.५ मध्ये रघु निकम यांच्या वारसाविरूध्द दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो दावा ही माझा सि.स.नं. १५३४ मध्ये संबंध नसताना दाखल केलेला आहे व तो त्या न्यायालयात प्रलंबित आहे.

मी प्र.वादीला दावा दाखल करण्यापुर्वी नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कायदयाप्रमाणे नोटीस देणे हे बंधनकारक असते. मला प्र.वादीला नोटीस देण्यास काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आमचे पुर्वहक्कदार बजरूद्दीन आणि त्यांचा मुलगा आयनुद्दीन यांनी प्र.वादी विरूध्द दावा मिळकतीबाबत कोणतीही तक्रार केली नव्हती. मी माझ्या पुर्वजांनी प्र.वादी विरूध्द दावा मिळकतीबाबत तक्रार केल्याचा कागद या कामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्र.वादींनी सन २०२२ मध्ये दावा मिळकतीमध्ये कोणतेही नवीन बांधकाम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्र.वादीने जुने बांधकामाची दुरूस्ती केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९० साली प्र.वादी नं. १ ते ४ यांना दावा मिळकत लायसन्सी हक्काने दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७/०१/२०२२ रोजी आम्ही प्र.वादींना बांधकाम करू नका असे सांगण्यासाटी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्र.वादीने नवीन बांधकाम केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रे.क.नं.३१/२२ हा दावा ज्या कारणासाठी काढून घेतला होता त्या कारणासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्र.वादीचे पुर्वहक्कदार हे सन १९३७ पासून मालकी हक्काने वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मुदतीत नाही. शाहरूख झाकीर हेरवाडे हा माझा मुलगा आहे. तो मुंबई येथे पोलिस खात्यामध्ये नोकरीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा वारंवार २०२२ मध्ये हुपरी पोलीस स्टेशनला फोन करून प्र.वादी नं. १ ते ४चा वाद मिळकतीमधील कब्जा घेण्याचा प्रयत्न करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठीच आम्ही हक्कज्ञापनाचा व मनाईचा दावा रे.क.नं.३१/२०२२ हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यामध्ये यश येणार नाही म्हणून प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा व चुकीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा कायदयाप्रमाणे चालण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण,**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष**

सही/-

**(डी. बी. साठे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**इचलकरंजी.**

**ठिकाण –इचलकरंजी**
**दिनांक – ०४/११/२०२५**